**PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION**
**JAGADGURU SANT TUKARAM MAHARAJ SANTPITH**
**SCHOOL & JR. COLLEGE**
Patilnagar, Talgaon Chikhali, Pune - 411062
Affiliation No: 1120131 School Code: 32147 UDISE CODE: 27252000538
Contact No: 9022816058
E-mail: santpithschool@gmail.com

जा.क्र.संतपीठ/स्कूल/०१/कावि/७०७ /२०२६ - २०२७ दिनांक - १३ /०८/२०२६

**विषय:** पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रवर्तित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या बैठकीसाठी स्कूल बेंच खरेदीबाबत...

प्रति,
मा.---------------------
---------------------
---------------------

**कोटेशन नोटीस क्र. १२/२०२६ - २०२७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रवर्तित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या बैठकीसाठी स्कूल बेंच खरेदी करणेकामी व सदर साहित्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकामी सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे...

| अ.क्र | साहित्याचा तपशील | स्पेसिफिकेशन | नग संख्या | सर्व करांसह प्रति नग दर |
|---|---|---|---|---|
| १. | स्कूल बेंच | **Benches (Secondary)**<br>Two Seater School Benches Size : 762 mm x 813 mm x 1067 mm<br>Square Pipe : 25 mm x 25 mm x 1.25 mm<br>Support Pipe : 50 mm x 25 mm x 1.25 mm<br>Book Self : 203 mm MS sheet (Front Closed 203 mm MS sheet)<br>MS sheet 8.0 mm<br>Top 406 mm, Seat 279 mm, Back 178 mm<br>18 mm Commercial plywood with Laminate,<br>Sun mica 1 mm thick one side,<br>Leveral, Top, Seat, Back<br>Teak wood Lipping 19 x 6 mm with Polish. | १ | |

**कोटेशन नोटीस व नियम अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इच्छुक ठेकेदारांनी / पुरवठाधारकांनी उपरोक्त नमूद केलेल्या साहित्य / कामाचे दर दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली यांचे नावे दिनांक १३ ऑगस्ट २०२६ ते २२ ऑगस्ट २०२६ अखेर दुपारी ३:०० वाजेपर्यंत जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ येथे सादर करावे.
२. पुरवठा धारकाने कोटेशन सोबत शॉप ॲक्ट / उद्यम आधार नोंदणी दाखला, पॅनकार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र, आयकर भरत असलेबाबतचा मागील २ वर्षाचा पुरावा इ. कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यात याव्यात.
३. पुरवठा धारकाने आपले दर सर्व करासह व वाहतूक खर्चासह पोहोच देण्यात यावे.
४. कोटेशन नोटीसमधील नमूद स्पेसिफिकेशनुसार स्कूल बेंचचा पुरवठा स्वखर्चाने जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज हे पाटीलनगर, टाळगाव चिखली येथे करावा लागेल.
५. पुरवठा आदेशानुसार दिलेल्या मुदतीत सदर साहित्याचा पुरवठा न केलेस प्रतिदिनी रक्कम रुपये ५००/- विलंब शुल्क आकारणेत येवून त्याची देय बीलातून वसुली करणेत येईल.
६. मंजूर केलेले दर सदर साहित्याचा पुरवठा पूर्ण होईपर्यंत पुरवठाधरकावर बंधनकारक राहतील.
७. पुरवठा धारकास कोणत्याही प्रकारची भाववाढ / नुकसान भरपाई मिळणार नाही.
८. सिलबंद कोटेशन पाकिटावर नोटीस क्रमांक फर्म /कंपनीचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.
९. उशिरा आलेल्या व अपुऱ्या तसेच अटीयुक्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

१०. कोटेशन मंजूर दराने पुरवठाधारकाने कामकाज करून देण्यास अथवा साहित्याचा पुरवठा करणेस टाळाटाळ करणेस असमर्थता दर्शविलेस किंवा साहित्याचा पुरवठा अर्धवट केल्यास कोटेशन नोटीस मधील नमूद अटीचा भंग केल्यास संबंधित पुरवठाधारकाचा पुरवठा आदेश रद्द करणेत येईल व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.भांखस – प्र.क्र.८२/भाग III/उद्योग - ४ दि.१/१२/२०१६ नुसार त्यांचेवर विधिवत कार्यवाही करणेत येईल.

११. कोटेशन संपूर्ण प्रक्रियेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ) हे लवाद म्हणुन जो निर्णय देतील तो अंतिम राहील. जो उभयंतावर बंधनकारक राहील.

१२. सदरचे काम हे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राचार्य यांच्या सूचनेनुसार करावयाचे आहे. त्यांच्या पोहोच चलनानुसार बील अदा करणेत येईल.

१३. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांनी राखून ठेवला आहे.

१४. सदरची कोटेशन नोटीस संतपीठाचे www.santpithpcmc.com या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

(संदीप खोत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ